# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२०/०९/२०१६

**१) संगनमत करुन मारहाण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १८/०९/२०१६ रोजी १५.०० ते १६.०० वा. दर. यातील फिर्यादी जगदीश नत्थु खोब्रागडे वय ४५ वर्ष, रा. टांगा यांच्या हिस्याला आलेल्या शेती वरील विहरीचे पाणी शेतीला देण्याकरीता विहरीवरील मोटारपंपाचे पाईप काढण्याचे कारणा वरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ केली व लाथा बुक्यांनी व दोरीच्या सटक्याने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) विषारी सापाने द्वंश केल्याने उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. १९/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील मृतक रुखमा कपुर ठवरे वय ३८ वर्ष, रा. खमारी ही शेतावर गवत आनण्यास गेली असता तीला कोणत्यातरी विषारी सापाने उजव्या पायाला चावा घेतल्याने तीला औषधोपचारा करीता प्राथमीक उपचार केन्द्र खमारी येथे नेले असता प्रकृती जास्त बिघडल्याने तीस पुढील उपचारा करीता सा.रु.भंडारा येथे नेत असता रस्त्यात मरण पावल्याने प्रेत सा. रु. भंडारा येथे पिएम करीता ठेवण्यात आले असे फिर्यादी गजानन हिरामन ठवरे वय २१ वर्ष, रा. खमारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. केने पो.स्टे. कारधा हे करित आहेत.

**४) औषधोउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिंनाक. १९/०९/२०१६ रोजी २०.३० वा. पुर्वी यातील मृतक भारत दामा सयाम वय ३५ वर्ष, रा. शंकरपुर (वडेगाव) हा फिर्यादीचा लहान मुलगा असुन दि. १९/०९/२०१६ चे १२.०० वा पासुन मृतक याचे पुर्ण अंगपाय शरीर दुखत आहे असे सांगीतले वरुन त्यास उपचारा करीता डॉ. ठाकरे यांचे कडे उपचार करुन पुन्हा साकोली येथे डॉ. तुमसरे यांचेकडे उपचार करुन प्रकृती जास्त खराब झाल्याने उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे भरती करुन सलाईन उपचार सुरु करताच तो २०.३० वा. दर. मरण पावल्याचे डॉ. ने घोषीत केल्याने फिर्यादीने मृतक मुलगा हा कोणत्यातरी आजाराने मरण पावला आहे. असे फिर्यादी दामा गोमा सयाम वय ६२ वर्ष, रा. शंकरपुर (वडेगाव) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करित आहेत.

५) अचानक इसमाचा मृत्यु . :–

दिंनाक. १९/०९/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील फिर्यादीचा मोठा भाऊ मृतक यशवंतराव देवराम पुडके वय ४५ वर्ष, रा. जे. टाईप जवाहरनगर हा फस्टशिप डयुटी करीता आपल्या सायकलने जात असतांनी अचानक सायकलवरुन खाली पडुन बेशुध्द झाल्याने लोकांनी त्यास औषधेपचारा करीता आयुध निर्माणी जवाहरनगर येथील दवाखाण्यात नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी विजय देवराम पुडके वय ३० वर्ष, रा. गोपेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करित आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.